
कॅंडलस्टिक पॅटर्न्स
शेअर मार्केट शिका मराठीमधुन
नीरज बोरगांवकर
www.guntavnook.com

आपल्या मराठी माणसांनी शेअर मार्केटमधील प्रचंड मोठ्या संधीचा फायदा घेतला पाहिजे असे मला नेहमी वाटते. याकरिता मी अनेक वेगवेगळे उपक्रम करत असतो. "कॅंडलस्टिक पॅटर्न्स" या ई-पुस्तकाच्या माध्यमातुन **शेअरची किंमत भविष्यात कुठे जाऊ शकते**? हे ओळखण्याची एक जपानी पद्धत मी तुम्हाला शिकवणार आहे.

*या पुस्तकात दिलेल्या गोष्टी व्यवस्थित समजुन घ्या आणि शेअर मार्केटच्या अभ्यासाची सुरुवात करा. "जो शिकतो तोच टिकतो" आणि "जो टिकतो तोच जिंकतो" हे तत्व लक्षात घ्या. आपल्याला शेअर बाजार व्यवस्थित शिकुन घ्यायचा आहे आणि यात टिकुन रहायचे आहे. हे आपण सातत्यपूर्वक केले तर आपल्याला शेअर बाजारात जिंकण्यापासुन कोणीच अडवु शकत नाही.*

*-नीरज बोरगांवकर*

# डिस्क्लेमर

या पुस्तकात दिलेल्या सर्व गोष्टी या फक्त अभ्यासाकरिता आहेत. कोणताही गुंतवणुकीचा निर्णय घेण्यापूर्वी पूर्ण अभ्यास आणि सारासार विचार हे करुन तुम्ही निर्णय घेणे अपेक्षित आहे. या पुस्तकाचा हेतु वाचकांचे प्रबोधन करणे हा आहे. या पुस्तकच्या माध्यमातुन कोणत्याही प्रकारचा गुंतवणुकीचा सल्ला देण्यात येत नाही याची नोंद घ्यावी.

(This e-book is not for sale. This is for private circulation only)

***चला तर मग सुरुवात करुयात!!***

# कॅंडलस्टिक म्हणजे काय?

कॅंडलस्टिक्स ही कोणत्याही शेअरच्या किमतीची मूव्हमेंट दाखवण्याची पद्धत आहे.

शेअर्सना असणारी मागणी आणि शेअर्सचा पुरवठा यामुळे शेअर्सची किंमत सतत वर खाली होत असते.

या वरखाली होणाऱ्या किमतीचे चित्र आपल्याला चार्टमध्ये दिसते. हे चित्र वाचुन आपण शेअरच्या किमतीच्या पुढील दिशेचा अंदाज बांधु शकतो.

कोणत्याही शेअरच्या किमतीचे चार्ट्स तुम्ही

https://in.tradingview.com
या वेबसाईटवर विनामूल्य पाहु शकता.

कोणत्याही कालावधीमध्ये (टाईमफ्रेममध्ये) म्हणजेच

एका दिवसात, किंवा
एका मिनिटात, किंवा
एका आठवड्यात, तसेच
एका महिन्यात,

एखाद्या शेअरची किंमत
कितीला "ओपन" झाली?,

कितीपर्यंत वर म्हणजेच "हाय" वर गेली?,


किती खाली म्हणजेच "लो"वर गेली?, आणि

किती किमतीला बंद झाली?
हे चार डेटापॉईंट्स आपल्याला कॅंडल्स वरुन समजतात.

# आपण एका दिवसाचा विचार करुयात

समजा अबक लिमिटेड या कंपनीच्या शेअरचे ट्रेडिंग सुरु आहे.

- मार्केट 9:15 वाजता उघडले आणि पहिला ट्रेड 100/- रु. ना झाला, तर कॅंडलचा "**ओपन**" असेल 100
- समजा त्या दिवसभरात शेअरने 110/- रु. चा टॉप लावला, तर कॅंडलचा "**हाय**" असेल 110
- समजा त्या दिवसभरात शेअर 90 रु. पर्यंत खाली गेला, तर कॅंडलचा "**लो**" असेल 90
- समजा शेअरचा त्या दिवशीचा बंद भाव 105/- रु. झाला, तर कॅंडलचा "**क्लोज**" असेल 105




या कॅंडलचा रंग हिरवा दिसेल कारण "ओपन" खाली झाला आणि "क्लोज" वर झाला


# आता दुसरे उदाहरण बघा

- तसेच समजा मार्केट 9:15 वाजता उघडले आणि पहिला ट्रेड 100/- रु. ना झाला, तर कॅंडलचा "**ओपन**" असेल 100

- समजा त्या दिवसभरात शेअरने 110/- रु. चा टॉप लावला, तर कॅंडलचा "**हाय**" असेल 110

- समजा त्या दिवसभरात शेअर 90 रु. पर्यंत खाली गेला, तर कॅंडलचा "**लो**" असेल 90

- समजा शेअरचा त्या दिवशीचा बंद भाव 95/- रु. झाला, तर कॅंडलचा "**क्लोज**" असेल 95




या कॅंडलचा रंग लाल दिसेल कारण "ओपन" वर झाला आणि "क्लोज" खाली झाला

वरील उदाहरणामध्ये "टाईमफ्रेम" ही एका दिवसाची होती, कारण आपण एका दिवशीच्या डेटाचा विचार करत होतो.

असेच आपण वेगवेगळ्या टाईमफ्रेम्सचा विचार करु शकतो (जसे 1 मिनिट, 3 मिनिट, 5 मिनिट, 15 मिनिट, 1 तास, 1 आठवडा, 1 महिना, 1 वर्ष इत्यादी)

सामान्यतः पोझिशनल ट्रेडिंगसाठी एका दिवशीच्या टाईमफ्रेमचा विचार केला जातो. आणि इंट्राडेसाठी कमी कालावधीच्या टाईमफ्रेम्सचा विचार केला जातो.

"ओपन", "हाय", "लो" आणि "क्लोज" या चार डेटा पॉईंट्समुळे आपल्याला बाजाराचा मूड लक्षात यायला मदत होते.

या कॅंडल्सचे वेगवेगळे पॅटर्न्स असतात, ज्यावरुन आपल्याला त्या शेअरमध्ये सध्या ट्रेडर्सचा मूड "तेजी"चा आहे? की "मंदी"चा आहे? की "दिशाहीन" आहे हे समजायला मदत होते.

**आता मी तुम्हाला काही कॅंडलस्टिक पॅटर्न्सची ओळख करुन देतो.**


कॅंडलस्टिक्स या पद्धतीचा उगम "जपान"मध्ये झाला असल्यामुळे काही पॅटर्न्सची नावे जॅपनीज भाषेमध्ये आहेत आणि काही इंग्रजी भाषेमध्ये आहेत.

1- हॅमर- म्हणजेच हातोडीसारखा आकार असलेली कॅंडल. अशी कॅंडल दिसणे हे तेजीचे लक्षण आहे.




2- इन्व्हर्स हॅमर-


म्हणजेच उलट्या हातोडीसारखा आकार असलेली कॅंडल. अशी कॅंडल दिसणे हे तेजीचे लक्षण आहे.




3- बुलिश एन्गल्फिंग- आधीच्या लाल कॅंडलला झाकुन टाकणारी हिरवी कॅंडल. अशी कॅंडल दिसणे हे तेजीचे लक्षण आहे.




4- मॉर्निंग स्टार- जेव्हा शेअर डाऊनट्रेंडमध्ये असतो आणि अशी कॅंडल दिसली की ते ट्रेंड बदलण्याचे लक्षण मानले जाते.



5- थ्री व्हाईट सोल्जर्स- खाली दिलेल्या चित्रानुसार सलग तीन हिरव्या कॅंडल्स दिसल्या की ते तेजीचे लक्षण मानले जाते.




6- हॅंगिंग मॅन- लटकलेल्या माणसासारखी कॅंडल दिसणे हे मंदीचे लक्षण मानले जाते.



7- शूटिंग स्टार- खाली दिलेल्या चित्रानुसार कॅंडल दिसणे हे मंदीचे लक्षण मानले जाते.




8- बेअरिश एनगल्फिंग- आधीच्या हिरव्या कॅंडलला झाकुन टाकणारी लाल कॅंडल. अशी कॅंडल दिसणे हे मंदीचे लक्षण आहे.




9- इव्हिनिंग स्टार- जेव्हा शेअर अपट्रेंडमध्ये असतो आणि अशी कॅंडल दिसली की ते ट्रेंड बदलण्याचे लक्षण मानले जाते.





10- थ्री ब्लॅक क्रोज्- खाली दिलेल्या चित्रानुसार सलग तीन लाल कॅंडल्स दिसल्या की ते मंदीचे लक्षण मानले जाते.




11- न्युट्रल दोजी- अधिकचे चिन्ह दर्शवणारी कॅंडल ट्रेडर्सचा दिशाहीन मूड दर्शवते.



12- ड्रॅगनफ्लाय दोजी- इंग्रजी "टी" आकाराची ही कॅंडल तेजी दर्शवते.




13- ग्रेव्हस्टोन दोजी- उलट्या इंग्रजी "टी" आकाराची ही कॅंडल मंदी दर्शवते.



14- रायजिंग थ्री- चित्रात दर्शवल्यानुसार दोन हिरव्या कॅंडल्सच्या मध्ये तीन लाल कॅंडल्स दिसणे हे तेजीचे लक्षण मानले जाते.



15- फॉलिंग थ्री- चित्रात दर्शवल्यानुसार दोन लाल कॅंडल्सच्या मध्ये तीन हिरव्या कॅंडल्स दिसणे हे मंदीचे लक्षण मानले जाते.




16- हिरवी मारुबोझु कॅंडल- चित्रात दाखवल्यानुसार हिरवी कॅंडल दिसणे हे तेजीचे लक्षण आहे.




17- लाल मारुबोझु कॅंडल- चित्रात दाखवल्यानुसार लाल कॅंडल दिसणे हे मंदीचे लक्षण आहे.



18- बुलिश हरामी पॅटर्न- चित्रात दाखवल्यानुसार मोठ्या लाल कॅंडलच्या समोर एक लहान हिरवी कॅंडल दिसणे हे तेजीचे लक्षण मानले जाते.



19- बेअरिश हरामी पॅटर्न- चित्रात दाखवल्यानुसार मोठ्या हिरव्या कॅंडलच्या समोर एक लहान लाल कॅंडल दिसणे हे मंदीचे लक्षण मानले जाते.



कॅंडल्सच्या अभ्यासामध्ये असे अनेक पॅटर्न्स बघितले जातात.

इतके सगळे पॅटर्न्स बघुन कन्फ्युज होण्याची गरज नाही. एक गोष्ट कायम लक्षात ठेवा. शेअरचा भाव जिथे जाऊ शकेल अश्या दिशा तीनच असतात-

1- वर
2- खाली आणि
3- आहे तिथेच (दिशाहीन) राहणे

आपण बघितलेले तसेच इतर सर्व कॅंडलस्टिक पॅटर्न्स आपल्याला शेअरच्या किमतीच्या भविष्यातील दिशेचा अंदाज देत असतात. मी वर प्रत्येक पॅटर्नच्या पुढे तो पॅटर्न दर्शवित असलेली दिशा सांगितलेली आहे.

# तुमच्यासाठी एक्सरसाईझ

https://in.tradingview.com
या वेबसाईटवर जाऊन वेगवेगळ्या शेअर्सचे कॅंडलस्टिक चार्ट्स लावा, आणि वेगवेगळ्या टाईमफ्रेम्सवर त्या चार्ट्सचा अभ्यास करण्याची सुरुवात करा.

तुमचे काम सोपे होण्याकरिता अजुन एक रिसोर्स तुम्हाला देतो.

https://scanstock.in नावाची एक वेबसाईट आहे.
या वेबसाईटवर तुम्हाला सातत्यपूर्वक विविध शेअर्समध्ये तयार होणारे कॅंडलस्टिक पॅटर्न्स आणि ते दर्शवित असलेली दिशा ही वेळोवेळी कळु शकेल,

आणि भविष्यात वर जाऊ शकणारे शेअर्स तुम्ही निवडु शकाल. या वेबसाईटवर तुम्हाला बरेच वेगवेगळे कॅंडल पॅटर्न्स आणि त्यांचा अर्थ समजु शकेल.

आपण या पुस्तकात फक्त 19 प्रमुख पॅटर्न्स बघितले आहेत. याच्या व्यतिरिक्त इतरही अनेक कॅंडलस्टिक पॅटर्न्स असतात.

## हे सर्व पॅटर्न्स तुम्हाला https://scanstock.in

## या वेबसाईटवर सातत्यपूर्वक बघायला मिळतील.

तुम्हाला शेअर मार्केटचे प्रशिक्षण सोप्या पद्धतीने आयुष्यभर मिळत राहील असा एक प्लॅन आम्ही तयार केलेला आहे.
या प्लॅनचे नाव आहे **"पोर्टफोलिओ बिल्डर प्लॅन"**
(PBP)
या PBP ची संपूर्ण माहिती घेण्यासाठी आपला स्पेशल वेबिनार नक्की बघा.

**स्पेशल वेबिनार बघण्यासाठीची लिंक-**
marathimarket.in/special-access

आमच्या खास मार्केटिंग कॅंपेन अंतर्गत आम्ही या स्पेशल वेबिनारमार्फत अतिशय स्वस्तामध्ये तुम्हाला PBP चे सदस्यत्व देऊ करीत आहोत. PBP जॉईन करण्याची लिंक तुम्हाला या वेबिनारमध्येच मिळेल.

या स्पेशल डिस्काऊंटसाठी मर्यादित जागा आहेत.

महत्वाचे वरील लिंक क्लिक केल्यावर जर उघडली नाही तर हे आमचे स्पेशल डिस्काऊंट संपले आहे असे समजावे.

असे झाल्यास https://www.guntavnook.com या आमच्या वेबसाईटवरुन रेग्यलर किमतीमध्ये तुम्ही या प्लॅनचे सदस्यत्व घेऊ शकता.

तसेच दर शनिवारी संध्याकाळी 6 वाजता

## Neeraj Borgaonkar
## या युट्यूब चॅनलवर

आपला एक विनामूल्य लाईव्ह सेशन असतो. या लाईव्ह सेशनमध्ये आपण सातत्यपूर्वक शेअर मार्केटसंबंधी गप्पा मारत असतो. या गप्पांमधुन देखील तुम्हाला शेअर बाजाराविषयी अनेक गोष्टी शिकायला मिळु शकतील.

मराठी माणसाने शेअर मार्केटमध्ये यशस्वी व्हावे या हेतुने आम्ही सातत्यपूर्वक काम करीत आहोत.

आपल्या लोकांसाठी आम्ही सतत काही ना काही उपक्रम करीत असतो.

आमच्या सर्व उपक्रमांची माहिती नियमितपणे मिळवण्याकरिता Neeraj Borgaonkar या युट्यूब चॅनलला सबस्क्राईब करुन ठेवा.

तसेच https://www.guntavnook.com या वेबसाईटला भेट देऊन तेथील सर्व गोष्टींचा नीट अभ्यास करा.